# सहाय्यक नियंत्रक, वैध मापन शास्त्र यवतमाळ जिल्हा

## टिपणी

वैद्यमापन शास्त्र ही यंत्रणा अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय अंतर्गत कार्यरत आहे. मनुष्य हा संपूर्ण जीवनभर ग्राहक असतो. त्याच्या दैनंदिन व्यवहारात मापन हा अविभाज्य भाग आहे. व्यापा-याकडून होणारी ग्राहकाची फसवणुक रोखण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे कायदे व नियम तयार केलेले आहे.

१) वैधमापन शास्त्र कायदा- २००९

२) वैधमापन शास्त्र आवेष्टित वस्तू नियम- २०११

३) महाराष्ट्र वैधमापन शास्त्र अमलबजावणी नियम- २०११

उपरोक्त कायदा व नियमांचे राज्यात अमलबजावणी या खात्याचे विभागप्रमुख मा.नियंत्रक वैध मापन शास्त्र (महाराष्ट्र राज्य) मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली केले जाते. या यंत्रणेत विभागीय स्तरावर उपनियंत्रक व जिल्हा स्तरावर जिल्हा सहाय्यक नियंत्रकाचे पद आहे. जिल्हा सहाय्यक नियंत्रकाचे अधिपत्याखाली निरिक्षक क्षेत्रसहाय्यक व शिपाई ही पदे आहे.

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचारी | कार्यक्षेत्र (तालुका) | नाव | भ्रमणध्वनी/ दुरध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशास्त्र यवतमाळ | यवतमाळ जिल्हा | श्री.गो.वैद्य | ९९७५७८०१९४/ ०७२३२-२४२१५७ | aclmyeotmal @yahoo.in |
| २. | निरीक्षक वैध मापन शास्त्र, यवतमाळ | यवतमाळ, कळंब | सं.व.देशपांडे | ९४२१३८४४१८ | - |
| ३. | निरीक्षक वैध मापन शास्त्र, पांढरकवडा | पांढरकवडा, घाटंजी, राळेगाव | अ.म.खरात | ९८२२९२५५५४ | - |
| ४. | निरीक्षक वैध मापन शास्त्र, वणी | वणी, झरीजामणी, मारेगाव | वि.पू.कलोंडे | ९४२२८१६३१४ | - |
| ५. | निरीक्षक वैध मापन शास्त्र, पुसद | पुसद, दिग्रस, आर्णी | श.नी.मोरे | ९८२२२३६५०० | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | निरीक्षक वैध मापन शास्त्र, नेर | नेर, दारव्हा, बाभूळगाव | ध.प्र.देवडे | ७३८५७३७७५० | – |
| ७. | निरीक्षक वैध मापन शास्त्र, उमरखेड | उमरखेड, महागाव | आर.जी.चातरमल | ९४२२४६३८०१ | – |

यवतमाळ जिल्ह्यात अधिकारी/ कर्मचारी यांची संवर्गनिहाय मंजूर पदे, रिक्त पदे, कार्यरत पद याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| वर्ग २ | सहाय्यक नियंत्रक | ०१ | ०१ | – |
| वर्ग ३ | निरीक्षक | ०६ | ०६ | – |
| वर्ग ३ | लिपीक-टंकलेखक | ०२ | ०२ | – |
| वर्ग ३ | क्षेत्रसहाय्यक | ०४ | ०४ | – |
| वर्ग ४ | शिपाई | ०७ | ०७ | – |
| एकुण | – | ०२० | ०२० | – |

प्रत्येक निरीक्षक विभागात एक निरीक्षकाचे पद आहे. निरीक्षक क्षेत्रसहाय्यक व शिपाई यांचे सहाय्याने आपले विभागात वजनमाप कायद्याची अंमलबजावणी करीत आहे.

सहाय्यक नियंत्रक व निरीक्षक कार्यालय खाजगी जागेत भाड्याने घेतलेली आहे. या सर्व कार्यालयाच्या इमारत बांधकामकरीता शासकीय भूखंड उपलब्ध करून घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

यवतमाळ येथे सहाय्यक नियंत्रक व मानक प्रयोगशाळेच्या इमारत बांधकामाकरीता प्लॉट नं. १ शीट नं. २५ डी पोलिस कवायत मैदानासमोर ५०० ते ८०० चौ.मीटर जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव प्रलंबित आहे. केंद्र शासनाकडून मानक प्रयोगशाळेच्या इमारत बांधकामकरीता रूपये २५ लाख एवढा निधी उपलब्ध झालेला आहे. तरी सदर जागा या यंत्रणेला उपलब्ध करून देण्याची मा.जिल्हाधिकारी यांना विनंती आहे.

**<u>यवतमाळ जिल्ह्यात वजन माप यंत्रणेचे कामकाजाबाबत</u>**

वैध मापन शास्त्र कायद्याचे व नियमांचे अमलबजावणी करीत असतांना अधिनियम व नियमानुसार दरवर्षी व्यापा-यांचे वजने मापे मापन व तोलन उपकरणे यांची तपासणी शुल्क आकारून पडताळणी करण्यात

येते. व तसे प्रमाणपत्र संबंधितांना देण्यात येते. प्रत्येक जिल्ह्याला व प्रत्येक निरीक्षक विभागाला तपासणी शुल्क वसुलीचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. सन २०१४-१५ या वर्षाकरीता यवतमाळ जिल्ह्याला ३७.२ लाख रूपये एवढे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यापोटी यवतमाळ जिल्ह्याने ४१.०३ लाख एवढे उद्दीष्ट पुर्ण केलेली आहे.

तसेच या वर्षात अधिनियम व नियमांचे उल्लंघन करणा-या एकुण ६४६ व्यापा-यांवर खटले नोंदविण्यात आले आहे. त्यापैकी ५७७ खटले खात्यामार्फत तडजोडीने मिटविण्यात आले आहे. त्यापोटी एकुण २२.४९ लाख रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात एकुण व्यापारी, फेरीवाले, पेट्रोलपंप इत्यादीबाबत माहिती खालीप्रमाणे आहे,

| अ.क्र. | विवरण | संख्या |
|---|---|---|
| १. | व्यापारी | ५९०८ |
| २. | फेरीवाले | २२५० |
| ३. | औद्योगीक वसाहती | २१० |
| ४. | निमशासकीय कार्यालये | ३९ |
| ५. | कॉपरेटीव्ह सोसायटी | ४५ |
| ६. | रेल्वे स्थानके | २ |
| ७. | पोस्ट ऑफीस | ४५ |
| ८. | पेट्रोल पंप | ९८ |
| ९. | वाहन काटा | २३५ |

आजकाल प्रामुख्याने सर्व वस्तू आवेष्टित करून विकत मिळतात व ग्राहक सुध्दा आवेष्टनामधील वस्तू विकत घेण्यास प्राधान्य देतात. वैध मापन शास्त्र आवेष्टित वस्तू नियम २०११ नुसार प्रत्येक आवेष्टीत वस्तूवर

१) वस्तूचे नाव

२) वस्तूचे वजन/ माप

३) उत्पादकाचे पुर्ण पत्ता, पिनकोडसहीत

४) वस्तू उत्पादनाची तारीख व वर्ष

५) अधिकतम किरकोळ किंमत सर्व करासहीत

६) कस्टमर केयर नंबर

या सर्व गोष्टींची घोषणा असणे आवश्यक आहे. सदर घोषणा आवेष्टनावर दर्शनी भागात ग्राहकाला दिसेल यानुसार असावी. सदर घोषणा नसलेलया आवेष्टित वस्तू जप्त करून उत्पादनावर व विक्रेत्यावर खटला नोंदवून कार्यवाही करण्यात येते.

एखादी आवेष्टित वस्तू छापील किंतीपेक्षा जास्त दराने विकत असणा-या व्यापा-यांवर खटला नोंदवून कार्यवाही करण्यात येते. ग्राहकाला वजने मापे विषयी काही गैर आढळल्यास तो E-mail ID वर तक्रार नोंदवू शकतो. ती अशी, dclmms@yahoo.in / dcmms_complaints@yahoo.com आहे. तसेच ०२२-२२८८६६६६ या दुरध्वनीवर प्रत्यक्ष फोन वरून तक्रार नोंदवू शकतो. तसेच यवतमाळ येथे सहाय्यक नियंत्रक वैधमापन शास्त्र कार्यालय, (पत्ता:- श्री महाजन यांचे घर पत्रकार कॉलनी) येथेही तक्रार नोंदविता येते. या कार्यालयाचा दुरध्वनी ०७२३२/२४२१५७ हा आहे. तसेच या यंत्रणेबद्दल काही माहिती उपलब्ध करून घेण्यासाठी या विभागाची एक स्वतंत्र वेबसाईट उघडलेली आहे. ती अशी, www.legalmetrology.maharashtra.gov.in

या यंत्रणेला विकास योजना राबविण्याकरीता निधी उपब्ध वा अनुदान प्राप्त होत नाही. व्यापा-यांकडील वजन माप यांची तपासणी करून, तपासणी शुल्क व दोषी व्यापा-यांवर खटले नोंदवून त्यांना दंड करून दंडाची रक्कम शासन जमा करण्यात येते. ग्राहकाला वस्तु घेतांना ती योग्य मापात व योग्य किंमतीला मिळावी हेच या यंत्रणेचे उद्दीष्ट असून त्याकरीता यवतमाळ जिल्ह्यात अंमलबजावणीचे काम सुरू आहे.

**सहाय्यक नियंत्रक,**

**वैध मापन शास्त्र यवतमाळ जिल्हा**